अवघाचि संसार

[illegible] संगीत रचना वेधक.

Name of film to be quoted.

किंमत ६ नया पैसा

कथासार

सदा आणी जगू हे दोघे बालपणींचें मित्र आणि त्यांच्या अजोड मित्रप्रेमाचें प्रतीक म्हणजे त्यांची डबलसीटर सायकल तिला चाकें दोनच पण चालवायची ती दोघांनीच असें तिचें स्वरूप आणि धंदा म्हणजे त्यांचा हॉलिवुड फोटो स्टुडिओ, दोघे कलावंत असूनही धंदा जेमतेमच, पण एके दिवशीं त्यांना लिलीचा फोटो काढण्याचा योग आला. लिली म्हणजे कोणी नटी नाहीं हैं परंतु मोठ्या घरची छोटीशी आणि पोज मात्र नटीसारखी अतुष्पाद मेनका कुत्री, रिवाजाप्रमाणें अॅडव्हान्स पांच रुपये घेऊन खुषीनें पोटभर जेवण्यासाठीं दोघे बाहेर पडले, परंतु दैवानें वगळेंच वाढून ठेवलें होतें. खुषीने गाणें म्हणत जात असतां त्यांच्या सुदैवाने अपघात झाला. दोन सायकलींची टक्कर झाली. सुमन चिडली कारण बॅंकेत नोकरी वर जायला उशीर झाला होता सदाने तिला आपल्या डबल सीटवरून बॅंकेत नेऊन सोडली अपघातांत सायकलच्या चाकानें आकार सोडला अन् सदाच्या जीवनाला वेगळा आकार मिळाला, सदा तिच्या सौंदर्यावर लुब्ध झाला, वायाळ झाला.

पुढें पडद्यावर पहा.

— अनंत पिक्चर्स —

अवघाचि संसारचीं गाणीं

दिग्दर्शक–अनंत माने ░ संगीत–वसंत पवार

कलाकार–राजा गोसावी, जयश्री गडकर, विवेक, नयना पद्मा चव्हाण, राजन, दामूअण्णा मालवणकर, वगैरे

गाना नं. १

राम भजन कर लेना
एक दिन जानारे भाई ॥ धृ ॥
दोन दिवसाची ही तर दुनियां
ही पैशाची सारी किमया
धन दौलत ही केवळ माया
अंती येतां हांक दूरची
जिथल्या तेथें राही ॥ १ ॥
बाप कोठला अन् कुठली आई
कुठले भाऊ अन् कुठल्या ताई
अखेर आपुलें कोणी नाहीं
तुटे पिंजरा सुटे पांखरूं
दूर भरारी घेई ॥ २ ॥
पाया पडतां लाथ मारिती
लाथ मारितां गुलाम होता

हीच जगाची उलटी रीती
अशा जगाजी कशास पर्वा
पडूं नको या मोही
एक दिन जानारे भाई ॥ ३ ॥

पार्श्वगायक—वसंत देसाई

गाना–२ मधुर संगीत

जें वेड मजला लागलें
तुजलाहो तें लागेल कां ? ॥ धृ ॥
माझ्या मनींची ही व्यथा !
कोणी तुला सांगेल कां ?
जें वेड मजला लागलें ॥
मी पाहतों स्वप्नीं तुला ।
मी पाहतों जागेपणीं ॥
जें मी मुकेपणीं बोलतों ॥
शद्बांत तें रंगेल का ?
जे वेड मजला लागलें ॥
हा खेळ घटकेचा तुझा
घायाळ मी पण जाहलों
जे जागलें माझ्या मनीं ॥

चित्तीं तुझ्या लागेल कां ?
जें वेड मजला लागलें ॥
माझे मनोगत मी तुला ।
केले निवेदन आज गे ।
सर्वस्व मी तुज वाहिलें
तुजला कधीं उमगेल कां ?
जें वेड मजला लागलें—
तूजला ही लागेल का ?
पार्श्वगायक—**सौ. आशा भोसले, सुधीर फडके**

गाना–३

बहरुनी ये अणूअणूं
जाहली रोमांचिक ही तनू ॥ धृ ॥
नकळत मिळतां नजरा दोन्ही
लहरत गेली वीज नसांतूनी
गेलें बाई मी बावरून
किमया घडली जणूं ॥ १ ॥
उमलून आली रात्र चांदणी ॥
गंध दरवळे फुलावांचुनी
अंगावर लहर चांदनी
सुख लागे झुणुंझुणूं ॥ २ ॥

दवांवरी तें सुख टपटपलें
ओठांनी या अलगद टिपलें
आजवरी जे हृदयीं जपलें
तेंच लाभलें जणू ॥ ३ ॥

पार्श्वगायिक–सौ. आशा भोसले

गाना–४

तो—रुपास भाळलों मी भुललों तुझ्या गुणाला
मज वेड लावलें तूं सांगू नको कुणाला ॥ धृ ॥
ती—एकांत पाहुनियां जें तूं मला म्हणाला ॥
ऐकुन लाजलें मीं सांगू नको कुणाला।
तो—चंद्रा ढगांतुनी तू हांसलास कां उगारे
वांकून खालती अन् कां ऐकलेंस सारें
जें ऐकलें तू बातें सांगू नको कुणाला ॥
ती—वाऱ्या तुझी कशाने चाहूल मंद झाली ॥
फुलल्या फुला कशाने तूं हंसलास गाली
जें पाहिलें तु बातें सांगू नको कुणाला ॥
तो—हें गोंड रूप ऐसे, निरखीन मी दुरून
पाण्या अशीच ठेवी छाया उरीं धरून ॥
धरीलेंस जें उरीं तें सांगू नको कुणाला ॥
ती—हा लाजरा शहारा पाहील काय कोणी ॥

करतील का चहाडी हे लाल गाल दोन्ही
गालांत रंगले जे सांगू नको कुणाला ॥

पार्श्वगायक–सुधीर फडके

गाना नं. ७

फुले स्वराची उधळित भवती
गीत होय साकार
मी आळवितें केदार ॥ धृ० ॥
गोड कांहीं तरी मना वाटलें
अबोध सुंदर भाव दाटले
कंपित होतां तार
आज मी आळविते केदार ॥ १ ॥
फिरत अगुली वीणे वरती
नैनांतुनी संवाद उमलती
स्वरा स्वरांवर लहरत जाती
भाव फुले सुकुमार
आज मी आळवितें केदार ॥ २ ॥
जें शब्दाच्या अतीत उरतें
स्वरांतुनी या तें पाझरतें
एक अनामिक अर्थ घेतसे

स्वरांतुनी आकार । आज मी आळविते केदार ॥ ३ ॥

पार्श्वगायिका —मधुबाला जव्हेरी

आली सखी आली प्रिया मिलना।
काजल कुंकुम रेखून ल्याली
साडी जांभळी हिरवी चोळी
घेई तनुवरी शेला भरजरी
लपवी यौवन खुणा ॥ १ ॥
काय पाहती व्याकुळ लोचन ।
कानोसा घे मधेंच थबकून
आतूर अंतरी कंपित अधरीं
थरथरते कां मना ॥ २ ॥
बकुळ फुलांनी गुंफिली वेणी
कर्णभूषणें झुकती कानीं
रुणुझुणु गाती कंकण हातीं
गुपित सांगती जना ॥ ३ ॥

पार्श्वगायक—वसंत देसाई

बापू रंगू शेवाळे
प्रकाशक—शौकत हुशेन अँण्ड महम्मद युसूफ
बुकसेलर, दो टाकी, बाप्टी रोड, बम्बई नं ८

महादेव प्रिं. प्रेस, नायगांव मुंबई नं. १४